[२०२४] ३ एस. सी. आर. १००९ : आयएनएससी २५१

(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

हरेश शांतीलाल अवलानी आणि इतर

विरुद्ध

द न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी लि.

(दिवाणी अपील क्रमांक ४०२९ - ४०३०/ २०२४)

१२ मार्च, २०२४

[न्या. हिमा कोहली आणि न्या. अहसानुद्दीन अमानुल्लाह]

विचारात घेण्यासाठीचा मुद्दा

दावेदारांसाठी देय नुकसान भरपाईची मोजदात करण्याच्या उद्देशाने गुणक लागू करण्यासाठी मृत व्यक्तीचे वय निश्चित करण्याशी संबंधित प्रकरण आहे.

हेड नोट्स

मोटार वाहन अधिनियम, १९८६ – नुकसान भरपाई – निश्चिती - मृत व्यक्तीचे वय किंवा अवलंबून असणाऱ्यांचे वय या आधारे गुणकाची मोजदात :

निर्णय : गुणकापर्यंत पोचण्यासाठी अवलंबून असणाऱ्यांचे वय नव्हे, तर मृतव्यक्तीचे वय विचारात घेतले पाहिजे - गुणकाच्या निवडीपर्यंत पोहोचण्यासाठी मृत व्यक्तीवर अवलंबून असणाऱ्यांचे वय याचा सुद्धा सुसंबद्ध विचार व्हायला हवा, असे निष्कर्ष पुन्हा नोंदवण्यात उच्च न्यायालयाने चूक केली आहे . [परिच्छेद ५]

उद्धृत केलेले निर्णय विधी

सुबे सिंग आणि इतर विरुद्ध श्याम सिंग (मयत) आणि इतर [२०१८] १ एस सी आर ६३६ : (२०१८) ३ एस सी सी १८ ; मुन्ना लाल जैन आणि इतर विरुद्ध विपिन कुमार शर्मा आणि इतर

[२०१५] ७ एस सी आर २०७ : (२०१५) ६ एस सी सी ३४७ ; रेश्मा कुमारी आणि इतर विरुद्ध मदन मोहन आणि इतर [२०१३] २ एस सी आर ७०६ : (२०१३) ९ एस सी सी ६५ ; सरला वर्मा (श्रीमती) आणि इतर विरुद्ध डीटीसी आणि इतर [२००९] ५ एस सी आर १०९८ : (२००९) ६ एस सी सी १२१ ; नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड विरुद्ध प्रणय सेठी आणि इतर [२०१७] १३ एस सी आर १०० : (२०१७) १६ एस सी सी ६८० ; रॉयल सुंदरम अलायन्स इन्शुरन्स कंपनी लिमिटेड विरुद्ध मंडला यादागरी गौड आणि इतर [२०१९] ६ एस सी आर ९४१ : (२०१९) ५ एस सी सी ५५४ - यावर भिस्त ठेवली.

प्रमुख शब्दांची यादी

नुकसान भरपाई ; गुणक ; मृत व्यक्तीचे वय ; अवलंबून असणाऱ्यांचे वय.

मधून उद्भवलेले प्रकरण

दिवाणी अपीलिय अधिकारिता : दिवाणी अपील क्रमांक ४०२९-४०३०/ २०२४.

एफ. ए. एन. क्रमांक ७५६ /२०१६ मधील मुंबई उच्च न्यायालयाच्या दिनांक १९.१०.२०१६ व २५.१०.२०१६ च्या न्यायनिर्णय व आदेशावरून

सह

दिवाणी अपील क्रमांक ४०३१/ २०२४

पक्षकारांसाठी उपस्थिती

अपीलकर्त्यांसाठी वकील - शंतनू आडकर, प्रवीण सताळे, ऋषभ जैन, राजीव शंकर द्विवेदी, एस. के. सरकार, शिवाजी एम.

जाधव, कु. अपूर्वा, आदर्श कुमार पांडे, विघ्नेश सिंग, दीपेश सिंघल, मेसर्स एस. एम. जाधव आणि कंपनी.

उत्तरवादीसाठी वकील - अंशुम जैन, रामेश्वर प्रसाद गोयल, रंजन कुमार पांडे, के.के.भट.

सर्वोच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय / आदेश

<u>आदेश</u>

१. अनुमती दिली.

२. या अपिलांमध्ये उपस्थित केलेला मुद्दा हा दावेदारांना देय नुकसान भरपाईची मोजदात करण्याच्या उद्देशाने गुणक लागू करण्यासाठी मृत व्यक्तीचे वय निश्चित करण्याशी संबंधित आहे.

३. दिवाणी अपील @ अपिलासाठी विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्रमांक १३०९३/२०१७ मधील अपीलकर्ते (मयत कार्तिक अवलानी चे आई वडील) हे उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधिशांनी दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी पारित केलेल्या

न्यायनिर्णयाने व्यथित आहेत, ज्यात, उत्तरवादी - विमा कंपनीने नुकसान भरपाई देण्याच्या त्यांच्या दायित्वाला आव्हान देणारे अपील हे अंशत: मंजूर केले गेले होते आणि अविवाहित व्यक्तीच्या बाबतीत, ते मृत व्यक्तीचे वय नाही, तर पालक जे दावेदार आहेत त्यांचे वय, हे संबंधित असले पाहिजे हि उत्तरवादी - विमा कंपनीने मांडलेली बाजू मान्य करत मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई[1] ने दिनांक १० जुलै २०१५ च्या आदेशानुसार याचिका दाखल झाल्यापासून ते वसुलीपर्यंत वार्षिक ७.५ टक्के दराने व्याजासह रु. २०,७०,०००/- (रु. वीस लाख सत्तर हजार) म्हणून अंदाजे दिलेली नुकसान भरपाई हि रु. १२,८२,५००/ (रुपये बारा लाख ब्याऐंशी हजार पाचशे) पर्यंत कमी केली होती. प्रस्तुतच्या प्रकरणात, अपघाताच्या वेळी मृत व्यक्तीचे वय २३ वर्षे होते आणि तो एका इन्व्हेस्टमेंट फर्ममध्ये मॅनेजर म्हणून काम करत असल्याचे सिद्ध झाले होते.

४. दिवाणी अपील @ अपिलासाठी विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्रमांक १३०७२ /२०१७ मधील मृत व्यक्ती (निलेश अरुण

1थोडक्यात 'एमएसीटी'

पाटील) चे वय २८ वर्षे होते. दावेदार हे मृत व्यक्तीचे आई-वडील आणि भाऊ आहेत. एमएसीटीने मृत व्यक्तीचे उत्पन्न दरमहा रु. ४,०००/- (रु. चार हजार) असे निर्धारीत केले आणि १७ चे गुणक लागू केले. भविष्यातील संभाव्यतेचा लाभ व अवलंबित्व गमावल्यानंतर, एमएसीटीने दिलेली नुकसान भरपाई हि दावा याचिका दाखल झाल्यापासून वसुली होईपर्यंत ७.५ टक्के व्याज दरा सह रु. ६,३७,०००/- (रुपये सहा लाख सदतीस हजार) निश्चित करण्यात आली होती. अपीलकर्त्यांनी उच्च न्यायालयात केलेल्या अपिलात, उच्च न्यायालयाने दिनांक १० जानेवारी २०१७ च्या न्यायनिर्णयाद्वारे मृत व्यक्तीचे उत्पन्न पुनःनिर्धारण केले आणि ते दरमहा रु. १२,१९४/- (रुपये बारा हजार एकशे चौऱ्याण्णव रुपये) पर्यंत वाढवले. मात्र, हायकोर्टाने एमएसीटीने लागू केलेल्या गुणकात हस्तक्षेप करून १७ चा गुणक लागू करण्याऐवजी तो १३ पर्यंत कमी केला. उच्च न्यायालयाने गुणक १७ वरून १३ करण्याचे कारण असे की, मृत व्यक्ती अविवाहित होती आणि दावेदार त्याचे पालक असल्याने गुणकाची निवड मृत

व्यक्तीच्या वयाच्या नव्हे तर पालकांच्या वयाच्या आधारे ठरवावी लागत होती. परिणामी, उच्च न्यायालयाने दिलेली रक्कम हि वार्षिक ७.५ टक्के व्याज दरासह रु. १४,२९,०००/- (रुपये चौदा लाख एकोणतीस हजार) होती.

५. अंदाजित नुकसान भरपाईची मोजदात करण्यासाठी अवलंबून असणाऱ्यांचे वय नव्हे तर मृत व्यक्तीचे वय विचारात घेतले पाहिजे, हा मुद्दा आता अनिर्णित राहिलेला नाही, हे आपण लक्षात घेऊ शकतो. सुबे सिंग आणि इतर विरुद्ध श्याम सिंग (मयत) आणि इतर [2], या मुन्ना लाल जैन आणि इतर विरुद्ध विपीन कुमार शर्मा आणि इतर [3] आणि रेश्मा कुमारी आणि इतर विरुद्ध मदन मोहन आणि इतर [4], या प्रकरणांत या न्यायालयाचे अनेक निर्णय दिलेले आहेत ज्यात असे मान्य केले गेले आहे की दावेदारांना देय नुकसान भरपाईच्या अंदाजासाठी लागू करावयाच्या गुणकाची मोजदात करण्यासाठी पालकांचे वय नव्हे तर मृत व्यक्तीचे वय हा निर्णायक घटक असेल.

2 [२०१८] १ एस सी आर ६३६ : (२०१८) ३ एस सी सी १८

3[२०१५] ७ एस सी आर २०७ : (२०१५) ६ एस सी सी ३४७

4[२०१३] २ एस सी आर ७०६ : (२०१३) ९ एस सी सी ६५

वरील निर्णयांनंतर सरला वर्मा (श्रीमती) आणि इतर विरुद्ध डीटीसी आणि अन्य[5] निर्णय घेण्यात आले होते. घटनापीठाने नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड विरुद्ध प्रणय सेठी आणि इतर[6] या प्रकरणात सुद्धा अशा प्रकरणात मोजदात करण्यासाठी गुणक लागू करण्याच्या अनुषंगाने सुबे सिंग (उपरोल्लेखित) संदर्भित केले आहे. रॉयल सुंदरम अलायन्स इन्शुरन्स कंपनी लिमिटेड विरुद्ध मंडला यादागरी गौड आणि इतर[7] या प्रकरणात नुकत्याच झालेल्या निर्णयात वर नमूद केलेल्या प्रकरणांमध्ये आढळलेल्या भूमिकेचा पुनरुच्चार करण्यात आला आहे. त्यामुळे गुणका पर्यंत पोचण्यासाठी अवलंबून असणाऱ्यांचे वय नव्हे, तर मृत व्यक्तीचे वय विचारात घेतले पाहिजे, असे आमचे मत आहे आणि गुणकाच्या निवडीपर्यंत पोहोचण्यासाठी मृत व्यक्तीवर अवलंबून असणाऱ्यांचे वय याचा सुद्धा सुसंबद्ध विचार व्हायला हवा, असे निष्कर्ष पुन्हा नोंदवण्यात उच्च न्यायालयाने चूक केली आहे .

5[२००९] ५ एस सी आर १०९८ : (२००९) ६ एस सी सी १२१

6[२०१७] १३ एससीआर १०० : (२०१७) १६ एस सी सी ६८०

7[२०१९] ६ एससीआर ९४१ : (२०१९) ५ एस सी सी ५५४

६. त्यानुसार, एफ. ए. ओ. क्रमांक ७५६ /२०१६ संदर्भातील दिवाणी अपील @ अपिलासाठी विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्रमांक १३०९३ / २०१६ मधील दिनांक १९ ऑक्टोबर २०१६ रोजीचा आक्षेपित न्यायनिर्णय रद्द बातल करण्यात येत आहे आणि बाजूला ठेवण्यात येत आहे आणि प्रस्तुतच्या प्रकरणात दिनांक १० जुलै २०१५ रोजी माननीय एमएसीटीने दिलेला १८ चा गुणक निश्चित करणारा न्यायनिर्णय पूर्ववत केला जात आहे. उत्तरवादी - विमा कंपनीला असे निर्देश दिले जातात की अपीलकर्त्यांनी जी रक्कम आधीच भरली आहे त्याचे समायोजन करून उर्वरित रक्कम ही अद्ययावत व्याजासह द्यावी. ही रक्कम सहा आठवड्यांच्या आत एमएसीटीकडे जमा करण्यात येणार यावी.

७. त्याचप्रमाणे, प्रथम अपील क्रमांक ५०/२०१६ संदर्भातील दिवाणी अपील @ अपिलासाठी विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्रमांक १३०७२/ २०१७ मधील दिनांक १० जानेवारी २०१७ रोजीच्या आक्षेपित न्यायनिर्णय हा सुधारित करण्यात आला आहे च्या

मर्यादेपर्यंत की, गुणक हा एमएसीटीने निर्धारण केल्याप्रमाणे १७ असा लागू होईल. एमएसीटी हे , १३ पासून १७ पर्यंत गुणक बदलून उत्तरवादी क्रमांक २ - विमा कंपनीने अपीलकर्त्यांना देय असलेल्या रकमेची पुन्हा मोजणी करेल. उत्तरवादींनी आधीच भरलेली रक्कम समायोजित केल्यानंतर उर्वरित रक्कम उत्तरवादी क्रमांक २-विमा कंपनीने सहा आठवड्यांच्या आत जमा करावी.

८. वरील अटींवर अपील मंजूर करून निकाली काढले जातात.

हेड नोट्स तयार करणार : निधी जैन

प्रकरणाचा निकाल :

अपील निकाली काढण्यात आले.

- x - x - x - x - x - x - x - x -

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

- x - x - x - x - x - x - x - x -